# आधुनिक युग... यंत्रमानवाचे... 'अनुकूल'

विज्ञान आणि तंत्रज्ञान इतके झपाट्याने वाढते आहे की कालपर्यंत वापरात असलेले तंत्रज्ञान झपाट्याने कालबाह्य होत आहे. शिक्षण, नोकरी आणि व्यवसाय ह्या तिन्ही क्षेत्रात माणसाच्या प्रत्यक्ष सहभागाला आणि त्याच्या प्रत्यक्ष अस्तित्वाला अनन्यसाधारण महत्व असे. विज्ञान आणि तंत्रज्ञानात झपाट्याने बदल झाले आणि प्रगत माहिती तंत्रज्ञान, संगणकाचा वापर ह्यामुळे कृत्रिम बुध्दिमत्ता उदयास आली आणि विकसित देशात, व्यापार, उद्योग तसेच औद्योगिक क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमत्ता आणि यंत्रमानवाचा सहज वापर होऊ लागला. कृत्रिम बुध्दिमत्ता आणि यंत्रमानाचा वापर हा प्रगत आणि विकसित देशात वाढू लागला पण आजही भारतासारख्या विकसनशील देशात कृत्रिम बुध्दिमत्ता आणि यंत्रमानवाचा वापर सामाजिक दृष्टिकोनातून योग्य  ठरत नाही कारण वाढती लोकसंख्या आणि मोठ्या प्रमाणात तरुण बेरोजगार वर्ग असून त्या बेरोजगार तरुणांना नोकरी नाही आणि हाताला काम नाही.

कोरोनासारख्या महामारीत, माणसाचा माणसाशी संपर्क तुटला आणि नोकरी, शिक्षण आणि व्यवसाय ह्या क्षेत्रांत लक्षणीय बदल घडून आला. Work from home, zoom meeting, webinar अश्या माध्यमांमुळे माणसांच्या प्रत्यक्ष सहभागाची आवश्यकता कमी झाली आणि जणू माणसाचे एकाकीपण आणि isolation ही नवीन समस्या निर्माण झाली. त्यातून काही वृध्द आणि निवृत्त लोकांना एकाकी जीवन व्यतीत करणे भाग पडले. विभक्त कुटुंब पध्दती आणि कालानुरूप अनुभवास येणारे एकाकीपण ही मोठी समस्या निर्माण झाली. तसेच मोठी घरं आणि वाढते वार्धक्य यामुळे घरकामासाठी नोकर चाकर ठेवणे अपरिहार्य ठरले. घरात कामाला नोकर ठेवू शकतो पण भावनिक सहवास आणि बोलायला माणसं नाही ही वृध्द लोकांची खरी समस्या होय.

'सत्यजित रे' हा काळाच्या खूप पुढे विचार करणारा माणूस. उत्तम चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक तसेच कलात्मकरित्या चित्रपट निर्मिती ही खासियत. स्वतः एक उत्तम लेखक, बंगाली संस्कृतीत वाढलेला मोठा माणूस. खूप वर्षांपूर्वी, सत्यजित रे यांनी लिहिलेल्या 'अनुकूल' या कथेवर आधारित 'अनुकूल' हा लघुपट बघायला मिळाला. वृध्द निवृत्त, एकाकी जीवन जगणाऱ्या प्राध्यापकांच्या जीवनात, 'अनुकूल' नावाचा यंत्रमानव, त्याचा साथीदार आणि मदतनीस म्हणून प्रवेश करतो. त्यावर आधारित हा लघुपट. कथा साधारणतः अशी..

एक निवृत्त प्राध्यापक.. निकुंज चतुर्वेदी, आपल्या जुन्या पण मोठ्या घरात एकटे राहत असतात.. घरात कामाला मदतनीस म्हणून आणि जणू जिवंत माणसाचा सहवास लाभवा म्हणून  'human like thinking robot' ची सेवा देणाऱ्या चौरंगी ब्युरो सर्विसमधून तरुण दिसणारा, यंत्रमानव घरी

घेऊन येतात ..'अनुकूल' त्याचे नाव..अनुकूल २४ तास निकुंजजींच्या सेवेला हजर होतो.. घरातील कामे करताना, त्यांच्याशी बोलतो, सुसंवाद साधतो आणि निकुंजीना मोठा आधार प्राप्त होतो. त्याच दिवशी निकुंजींच्या घरी त्यांना भेटायला त्यांचा चुलत भाऊ रतन येतो.. अनुकूलला पाहून रतन उत्कंठतेने पाहात असताना, निकुंजजी अनुकूलची ओळख करून देतात. गेले १५ वर्ष असलेल्या नोकरीवरून, रतनला काढले जाते आणि त्या बेरोजगार अवस्थेत तो अनुकूल ह्या यंत्रमानावाचा तिरस्कार करतो ..निकुंज ह्यांच्या अपरोक्ष, दारूच्या नशेत रतन, अनुकूलच्या डोक्यात घाव घालतो आणि अनुकूल निकामी होतो... तरीही ब्युरोचे लोक अनुकूल यंत्रमानावला बदलून देतात आणि पुन्हा सेवेस रुजू करतात मात्र निकुंज यांना चेतावनी देतात. अनुकूलवर पुन्हा आघात झाल्यास, तो स्वरक्षणासाठी शॉक देऊ शकतो.. निकुंज यांचे अनुकूल सोबत पुन्हा जीवन सुरू होते.. अनुकूलला पुस्तके वाचण्याची आवड असते.. तो निकुंज सोबत सखोल चर्चा करू लागतो... अनुकूलला ते गीता आणि गीतेचे ज्ञान देतात... धर्म, अधर्म, नीती, अनीती ह्यांवर त्यांच्या चर्चा रंगतात.. एखादी गोष्ट योग्य की अयोग्य हे धर्माच्या नीतीनुसार ठरते आणि आपली जबाबदारी, duties ही परिस्थितीनुसार बदलते आणि त्याला धार्मिक आधार प्राप्त होतो.. त्या कृतीची योग्यता आपलं मन, हृदय ठरवते.. हे तात्त्विक विचार निकुंज, अनुकूलला समजवतात.

पुन्हा एकदा रतन, निकुंज ह्यांच्या घरी येतो, मात्र ह्यावेळी त्यांच्या काकांच्या दुःखाची बातमी घेऊन... आणि पुढे आनंदाने सांगतो की त्या काकांनी, त्यांची सगळी प्रॉपर्टी, रतनच्या नावावर केली.. निकुंज यांना त्यात रस नसतो मात्र अंत्यविधीस जायचे म्हणून निकुंज तयार होत असताना, पुन्हा रतन अनुकूलला डिवचतो आणि त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करतो... बाहेर पाऊस पडत असताना अचानक शॉक लागून रतन गतप्राण होतो... अनुकूलचा हा प्रतिकार असतो.. काही दिवसांनी वकील निकुंज यांच्या घरी येतात आणि त्यांच्या काकांच्या कोट्यवधी इस्टेटीचे एकमेव वारसदार म्हणून त्यांना घोषित करतात.. त्यावेळी प्राध्यापक हताशपणे अनुकूलकडे पाहत असताना, अनुकूल हृदयावर हात ठेवत त्यांना आश्वस्त करतो... जणू मूकपणे सांगतो, धर्मासाठी आणि नीतीसाठी काहीं गोष्टी कराव्या लागतात - जणू महाभारतातील अर्जुनासारख्या...

मानवी मूल्ये, माणसाचा सहवास आणि वृध्दापकाळी माणसाला हवाहवासा वाटणारा आपल्या माणसाचा सहवास.. नीती, अनीती.. धर्म, अधर्म ..ह्या मूल्यधारित पायावर उभी असलेली आपली समाजव्यवस्था.. अश्या वातावरणात, परिस्थितीने लादलेल्या एकाकीपणावर मात करण्यासाठी, यंत्रमानवाची सोबत, भारतासारख्या विकसनशील देशात 'अनुकूल' आहे का? ह्याचा विचार करायला भाग पाडते. देशात अनेक सुशिक्षित तरुण बेरोजगार असताना, यंत्रमानावाचा वापर आणि मानवी सेवेला त्याचा पर्याय म्हणून वापर होणे, हे अनुकूल आहे का प्रतिकूल ? ह्याचा विचार करायला भाग पाडते. यंत्रमानव कृत्रिम बुध्दिमत्तेच्या जीवावर उत्तम सेवा देऊ शकेल परंतु प्रेम, वात्सल्य, जिव्हाळा

ह्या भावनिक बाबींसाठी तो पर्याय ठरू शकत नाही...

**- मनोज कुरुंभटी**